**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः21.10.2024** **वारःसोमवार**

---

- आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीची 99 उमेदवारांची पहिली यादी जाहीर

- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या अनेक नेत्यांचं पक्षांतर

- खरीप पीक विम्यासाठी ७६ लाख ३६ हजारहून अधिक दावे आणि

- बंगळुरू क्रिकेट कसोटीमध्ये न्यूझीलंडचा भारतावर आठ गडी राखून विजय; मालिकेत 1-0 अशी आघाडी

**<u>विधान सभा भाजप जागा</u>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीनं 99 उमेदवारांची आपली पहिली यादी आज जाहीर केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दक्षिण पश्चिम नागपूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे. कामठी मतदारसंघामधून भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जामनेरमधून मंत्री गिरीश महाजन, तर बल्लारपूरमधून मंत्री सुधीर मुनगंटीवार निवडणूक लढवणार आहेत. या निवडणुकीसाठी भाजपानं काही विद्यमान आमदारांना पुन्हा संधी दिली आहे.

मुंबईत, वांद्रे पश्चिम मधून आशीष शेलार, मलबार हिलमधून मंगल प्रभात लोढा, कुलाब्यातून राहुल नार्वेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

तर पुण्यात कोथरूडमधून चंद्रकांत पाटील, शिवाजीनगरमध्ये सिद्धार्थ शिरोळे, आणि पर्वती मतदार संघात माधुरी मिसाळ यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे.  चिंचवडमधून शंकर जगताप, भोसरी मधून महेश लांडगे तर दौंड मधून राहुल कुल यांना भाजपानं उमेदवारी दिली आहे.

इचलकरंजीतून राहुल आवाडे, केजमधून नमिता मुंदडा यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

नांदेड जिल्ह्यात भोकर मतदारसंघात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

नाशिकमध्येही नाशिक पूर्व मधून आमदार ॲड. राहुल ढिकले, नाशिक पश्चीममध्ये सीमा हिरे, चांदवड- देवळा मतदार संघातून आमदार डॉ. राहुल आहेर तर बागलाणमधून आमदार दिलीप बोरसे यांना उमेदवारी घोषीत करण्यात आली आहे.

सोलापुरात दक्षिण सोलापूरसाठी सुभाष देशमुख, शहर उत्तर विधानसभेसाठी विजयकुमार देशमुख तर अक्कलकोट विधानसभेसाठी सचिन कल्याणशेट्टी यांना पुन्हा उमेदवारी जाहीर झाली आहे.

धुळ्यातही शिंदखेडा मध्ये आमदार जयकुमार रावल, धुळे शहर मतदार संघात अनुप अग्रवाल यांना उमेदवारी दिली आहे. शिरपुर मतदार संघातून माजी आमदार काशीराम पावरा यांना भाजपातर्फे उमेदवारी देण्यात आली आहे.

**<u>पक्ष बदल</u>**

विधानसभा निवडणुकीच्या जागांसाठी रस्सीखेच सुरू असताना, पक्षबदलाचे वारेही जोरदार वाहात आहेत. माजी आमदार कपिल पाटील यांनी काल दिल्लीत काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. वाशिम जिल्ह्यातले वंचित बहुजन आघाडीचे माजी पश्चिम विदर्भ अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ देवळे यांनी काल मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

**<u>मेटेपत्नी</u>**

दिवंगत आमदार विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांनी काल कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभुमीवरच हा पक्ष प्रवेश केला असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान बीडमध्ये भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी भारतीय जनता पक्षाला

सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. लवकरच पुढचा राजकीय निर्णय घेऊ असंही त्यांनी सांगितलं.

**<u>उपरकर उबाठा</u>**

तिकडे, मुंबईत माजी आमदार परशुराम उपरकर यांनी काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. नंदुरबार जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री माणिकराव गावित यांचे पुत्र भरत गावित यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे अध्यक्ष अजित पवार तसंच प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते.

**<u>जरांगे</u>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी भूमिका जाहीर केली आहे. जिथं आपला उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे तिथं उमेदवार देण्याची घोषणा काल झालेल्या बैठकीनंतर त्यांनी केली. तसंच इतर ठिकाणी मराठा आरक्षणाला समर्थन देणाऱ्याला मतदान करावं, असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं. जालना जिल्ह्यातल्या आंतरवली सराटी इथं एका सभेत ते बोलत होते.

**<u>मविनि</u>**

विधानसभा निवडणुकीसाठी उद्यापासून म्हणजे २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात होणार असून, २९ ऑक्टोबर ही उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख आहे. त्यानंतर ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी होणार असून ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे.

दरम्यान निवडणुकीत संपूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी केली जाणारी मतदान संयंत्रांची सरमिसळ प्रक्रिया काल मुंबईत पार पडली. मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातल्या ३६ विधानसभा मतदारसंघासाठी संयंत्रांची पहिल्या टप्प्यातली सरमिसळ प्रक्रिया पूर्ण झाली. सांगली, आणि बीड जिल्ह्यातही मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया काल पार पडली.

**<u>खरी पदावे</u>**

राज्यात खरीप पीक विम्यासाठी ७६ लाख ३६ हजारहून अधिक दावे शेतकऱ्यांनी विमा कंपनीकडे दाखल केल्याची माहिती राज्याचे कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी दिली आहे. याचे सर्वेक्षण सुरू असून नुकसान भरपाईबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती लवाटे यांनी दिली. दाखल दाव्यांपैकी ७६ लाख २० हजार २४४ दावे ऑनलाईन स्वरुपात तर १६ हजार ६२३ दावे प्रत्यक्ष दाखल झाले आहेत. एकट्या बीड जिल्ह्यातून सर्वाधिक १० लाख ८७ हजार ९४४ दावे दाखल झाले तर नांदेड जिल्ह्यातून ८ लाख ९ हजार २३५ दावे दाखल

करण्यात आले आहेत. गेल्या काही महिन्यात झालेल्या जोरदार पावसाचा फटका उडीद, मूग, सोयाबीन, कापूस, भाजीवाला, बाजरी या पिकांना बसला आहे. अशी माहिती आवटे यांनी दिली.

## डेअरी

दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, पशुखाद्य व्यावसायिक आणि शेतकऱ्यांसाठी आंतरराष्ट्रीय डेअरी आणि फिड प्रदर्शन पिंपरीमध्ये भरवण्यात येणार आहे. येत्या २४ ते २६ ऑक्टोबर या कालावधीत आटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटर इथं हे प्रदर्शन आयोजित केलं जाणार आहे. सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुलं असेल अशी माहिती संयोजक, प्राची अरोरा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## रायगड महिला मृत्यू

रायगड जिल्ह्यात हरिहरेश्वर इथं पर्यटक आणि हॉटेलच्या मालकात झालेल्या वादातून मालक महिलेच्या अंगावर गाडी घातल्यानं ती मृत्यूमुखी पडली. पोलिसांनी या प्रकरणी तिघांना ताब्यात घेतलं आहे.

## तुळजापूर आमदार

तुळजापूरचे माजी आमदार नरेंद्र बोरगावकर यांचं काल पहाटे पुण्यातल्या एका खासगी रुग्णालयात, उपचारादरम्यान निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. लातूर, बीड, धाराशिव या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचं त्यांनी काही काळ प्रतिनिधित्व केलं होतं. तसंच उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही ते काही काळ कार्यरत होते.

**क्रिकेट**

बंगळुरू क्रिकेट कसोटीमध्ये न्यूझीलंडनं काल भारताचा आठ गडी राखून पराभव केला आणि मालिकेत १-० अशी  आघाडी घेतली. भारतानं विजयासाठी दिलेलं १०७ धावांचं लक्ष्य न्यूझीलंडनं दोन गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केलं. उभय संघातील तीन सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना 24 तारखेपासून पुण्यात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर होणार आहे. तर तिसरा सामना एक नोव्हेंबरपासून मुंबईतल्या वानखेडे मैदानावर खेळला जाईल.

**परभणी पाणीपुरवठा**

धर्मापुरी जलशुद्धीकरण केंद्रानजीक बांधण्यात येणारं जलकुंड जुन्या कुंडाला जोडण्यात येणार असल्यानं परभणी शहराचा पाणीपुरवठा आजपासून तीन दिवस बंद राहाणार आहे. त्यामुळं नागरिकांनी पाण्याचा वापर काळजीपूर्वक करावा असं आवाहन परभणी महापालिकेनं केलं आहे.

**नांदेड पाऊस**

नांदेड जिल्ह्यात शनिवारी रात्रीपासून रविवारपर्यंत दमदार पाऊस झाला. जिल्ह्यातील दहा महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे.  लोहा तालुक्यातल्या अप्पर मानार धरणाचे पाच दरवाजे तर नांदेडमधील विष्णुपुरी प्रकल्पाचा एक दरवाजा काल उघडला होता.

**जालना दुधना**

जालना जिल्ह्यात परतूर तालुक्यातल्या निम्न दुधना प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात आला.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरंच प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.